# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर

(स्वायत्त)

## मराठयांचा इतिहास (इ.स.1600 ते 1707)

द्वितीय वर्ष कला

2020–21

मराठयांच्या इतिहासाची पर्शियन भाषेतील साधने

डॉ. अर्चना टाक

| अ.क्र. | ग्रंथ | लेखक | तपशिल |
|---|---|---|---|
| 1 | तारिख ए खाफिखान /मुन्तखबुललुवाब | महम्मद हाशिम खाफिखान | मोगल मराठा संघर्ष |
| 2 | मासिर ए आलमगिरी मराठे व औरंगजेब श्री. पगडी | साकी मुस्तैदखान | औरंगजेबाचा चरित्रग्रंथ |
| 3 | तारिख ए दिल्कुशा बुंदेल्यांची बखर पी एन पटवर्धन | भीमसेन सक्सेना | मोगल मराठा संघर्ष |
| 4 | फुतुहाते आलमगिरी | ईश्वरदास नागर | मराठा स्वातंत्र्ययुद्ध |

| अ.क्र. | ग्रंथ | लेखक | तपशिल |
|---|---|---|---|
| 5 | महम्मदनामा | जुहुर | विजापुरचा सुलतान महम्मद आदिलशहा व त्याच्या दरबारातील मराठा सरदारांची माहिती |
| 6 | हफ्त अंजुमन मोगल मराठा संघर्ष श्री पगडी | उदयराज मुन्शी | शिवचरित्रातील मिर्झा राजा जयसिंगाची स्वारी व पुरंदरचा तह हे प्रकरण |
| 7 | खुतुत ए शिवाजी | — | पत्रसंग्रह |

# तारिख ए खाफिखान/मुन्तखबुललुवाब

## महम्मद हाशिम खाफिखान

1. औरंगजेबाचा दरबारी इतिहासकार खाफिखान याने 1734 मध्ये हा ग्रंथ लिहिला.
2. मोगल सैन्यात अनेक जबाबदार पदांवर कार्यरत.
3. 1682 मध्ये तो औरंगजेबाबरोबर दक्षिणेत आला होता.
4. मराठा स्वातंत्र्ययुद्धात त्याने भाग घेतला होता.

# तारिख ए खाफिखान / मुन्तखबुललुवाब
## महम्मद हाशिम खाफिखान

या ग्रंथातुन पुढील माहिती मिळते

1. मराठयांची निंदानालस्ती.
2. शिवाजींच्या नीतिमत्तेची मुक्त कंठाने प्रशंसा.
3. ताराबाईंचीही स्तुती.
4. मोगलांनी मराठयांच्या किल्ल्यांना दिलेल्या वेढयांचा तपशिल.
5. मराठा स्वातंत्र्ययुद्धात मोगलानां आलेल्या अपयशाचे विवेचन.

''शहाजहान बादशहाने साठविलेला सगळा खजिना औरंगजेब बादशहाने ओतला, चिकाटीने युद्ध केले, हजारो माणसे मारली गेली. बादशहाने मराठयांच्या मुलुखात शिरून त्यांचे गगनचुंबी किल्ले घेतले, मराठयांना बेघर करून सोडले, पण मराठयांचा पराक्रम वाढतच गेला.''

— खाफिखान

## मासिर ए आलमगिरी – साकी मुस्तैदखान
## (मराठे व औरंगजेब – श्री. सेतु माधवराव पगडी)

या ग्रंथातुन पुढील माहिती मिळते

1. औरंगजेबाचा चरित्रग्रंथ.
2. साकी मुस्तैदखान 1682 मध्ये औरंगजेबाबरोबर दक्षिणेत आला होता.
3. औरंगजेबाचा एक विश्वासु अधिकारी.
4. त्याच्या  ग्रंथातील तारखा बऱ्याच अंशी बिनचुक.
5. 1658 ते 1707 पर्यंतचा इतिहास.
6. काही वेढयांची वर्णने तपशिलवार.
7. मोगलांचे पराभव झाकुन ठेवण्याकडे त्याचा कल.

# तारिख ए दिल्कुशा – भीमसेन सक्सेना
## (बुंदेल्यांची बखर – श्री. पी. एन. पटवर्धन)

या ग्रंथातुन पुढील माहिती मिळते

1. 1709 मध्ये हा ग्रंथ लिहिला.

2. भीमसेन सक्सेना 1682 मध्ये औरंगजेबााबरोबर दक्षिणेत आला होता.

3. शिवचरित्रातील काही प्रसंग त्याने लिहुन ठेवले आहेत.

4. औरंगजेबाचा मुलगा अकबर व छत्रपती संभाजी भेट, छत्रपती संभाजीस पकडुन औरंगजेबासमोर सादर केल्याचा प्रसंग या घटनांची तपशिलवार माहिती त्याने दिली आहे.

5. शिवाजींच्या कर्तृत्वाची प्रशंसा.

"शिवाजी हा एक सत्पुरूष होता. शिपाईगडी म्हणुन तो अद्वितीय होता. तो राजनीतिनिपुण होता. एकनिष्ठ सैनिकांना तो जीव की प्राण करी........."

– भीमसेन सक्सेना

# फुतुहाते आलमगिरी – ईश्वरदास नागर

1. औरंगजेबाचा विजय.

2. औरंगजेबाचा मुख्य न्यायाधिश शेख उल इस्लाम याचा कारकुन म्हणुन 1681 ते 1686 या काळात ईश्वरदास नागर याने काम केले.

3. मृत्युसमयीची संभाजीची स्वाभिमानी वृत्ती ईश्वरदास नागर याने स्पष्टपणे मांडली आहे.

4. मराठयांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या अभ्यासासाठी हा ग्रंथ उपयुक्त.

# महम्मदनामा – जुहुर

1. जुहुर याने लिहिलेल्या या ग्रंथातुन विजापुरचा सुलतान महम्मद आदिलशहा याची माहिती मिळते .

2. विजापुरच्या दरबारामध्ये असलेल्या मराठा सरदारांविषयी माहिती या ग्रंथात मिळते.

3. शहाजी राजांचे राजकीय जीवन व स्वराज्य स्थापनेच्या काळातील राजकीय परिस्थितीची माहिती.

# हफ्त अंजुमन – संकलन उदयराज मुन्शी
## (मोगल मराठा संघर्ष – श्री. सेतु माधवराव पगडी)

1. मिर्झा राजा जयसिंगाने 1665 मध्ये मोगल बादशहा औरंगजेब याला पर्शियन भाषेतुन लिहिलेल्या पत्रांचा संग्रह.

2. ही सर्व पत्रे मिर्झा राजा जयसिंगाचा चिटणीस उदयराज मुन्शी याने संकलित करून ठेवली आहेत.

3. या पत्रांमधुन पुरंदरचा वेढा, पुरंदरचा तह, मिर्झा राजा जयसिंगाची विजापुर मोहिम, शिवाजींची आग्रा भेट इ. विषयी माहिती मिळते.

# खुतुत ए शिवाजी– संकलन उदयराज मुन्शी

1. 32 पत्रांचा संग्रह.

2. यात शिवाजींनी औरंगजेबास लिहिलेल्या दोन पत्रांचाही समावेश आहे त्यात शिवाजींनी औरंगजेबाला जिझिया कर रद्द करण्यासंदर्भात लिहिलेल्या पत्राचाही समावेश आहे.